# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

# कारागृह व सुधारसेवा विभाग

## सुधारणा व पुनर्वसन

## दैनंदिन वृत्तपत्रीय कात्रणे

# दिनांक: ०९.०७.२०२५

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक

कारागृह व सुधारसेवा

महाराष्ट्र राज्य, पुणे

लोकमत

# खुनातील आरोपींची कारागृहात रवानगी

लोकमत न्यूज नेटवर्क

**अमरावती :** वलगावच्या ठाण्याचे सहायक उपनिरीक्षक अब्दुल कलाम हत्याकांडच्या दोन्ही आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली. मंगळवारी एका अल्पवयीनाला ताब्यात घेतले. त्याला बाल सुधारगृहात नेण्यात आले.

उधारीवरून २८ जून रोजी ड्युटीवर असताना एएसआय अब्दुल कलाम यांना तीन आरोपींनी प्रथम कारने धडक देण्याचा प्रयत्न केला, त्यानंतर चाकूने हत्या केली. पोलिसांनी या प्रकरणात जियानोद्दीन आणि आवेज खान यांना अटक केली, तर फाजील खान जखमी असल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले.

Hello Amravati
Page No. 1 Jul 09, 2025
Powered by: erelego.com

लोकमत

# लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार, जामिनास नकार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लग्नाचे आमिष दाखवून ५३ वर्षीय महिलेवर बलात्कार करणाऱ्या ४१ वर्षीय पुरुषाला दिल्ली उच्च न्यायालयाने जामीन देण्यास नकार दिला आहे. याचिकाकर्ता आणि आरोपीचे नाते सहमतीने होते हे सिद्ध करणारा कोणताही पुरावा नाही. घटस्फोटित महिलेची खोट्या आश्वासनांच्या आधारे दिशाभूल करण्यात आली आहे, असे न्यायमूर्ती स्वर्णकांत शर्मा म्हणाले.

सरकारी वकिलांनी आरोप केला आहे की, महिलेची त्या पुरुषाशी (बाइक) 'राइडर्स ग्रुप'च्या माध्यमातून ओळख झाली होती. त्याने स्वतःला नार्कोटिक्स विभागात डीसीपी असल्याचे सांगितले होते. तो पुरुष महिलेच्या घरी आला आणि लग्नाचे खोटे आश्वासन देऊन तिच्याशी जबरदस्तीने लैंगिक संबंध ठेवले. महिलेने आरोप केला की त्या पुरुषाने तिचे खासगी फोटो सार्वजनिक करण्याची धमकीही दिली होती, त्यानंतर तिने पोलिसांकडे धाव घेतली आणि एफआयआर दाखल केला.

## जामीन का फेटाळला?

न्यायालयाने व्हॉट्सॲप संवाद व इतर पुराव्यांवरून प्रथमदर्शनी निष्कर्ष काढला की आरोपीने घटस्फोटाच्या अर्जात फसवणूक केली. खोट्या आश्वासनांनी महिलेला फसवले. न्यायालयाने स्पष्ट केले की, "या परिस्थितीत शारीरिक संबंधासाठी मिळालेली संमती ही ना योग्य माहितीवर आधारित होती, ना ती स्वेच्छेची होती - ती फसवणुकीच्या आधारावर मिळविण्यात आली होती."

लोकमत

# आरोपपत्रातील कागदपत्रे ही 'मूल्यवान रोखाचा दस्तऐवज' च्या कक्षेत येत नाहीत : बचाव पक्ष

## 'पोर्शे' कार अपघात प्रकरण; युक्तिवादाला सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'पोर्शे' कार अपघातप्रकरणी आरोपपत्रात समाविष्ट करण्यात आलेली कागदपत्रे 'मूल्यवान रोखाचा दस्तऐवज' या संकल्पनेच्या कक्षेत येत नाहीत, असा युक्तिवाद 'ससून'च्या आपत्कालीन विभागाचा तत्कालीन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीहरी हाळनोरचे वकील ॲड. ऋषिकेश गानू यांनी मंगळवारी न्यायालयात केला.

कल्याणीनगर 'पोर्शे' कार अपघात प्रकरणात मुलांच्या रक्ताचे नमुने बदलण्यासाठी विशाल अगरवाल, शिवानी अगरवाल, अरुणकुमार सिंग यांनी अश्पाक मकानदार, अमर गायकवाड, आदित्य सूद, आशिष मित्तल यांच्याशी संगनमत करून शिपाई अतुल घटकांबळे याच्यामार्फत आपत्कालीन विभागाचा तत्कालीन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीहरी हाळनोर आणि न्यायवैद्यक विभागाचा तत्कालीन प्रमुख डॉ. अजय तावरे यांना लाच दिल्याचे तपासात निष्पन्न झाले.

शिवाजीनगर सत्र न्यायालयात क्षीरसागर कोर्टात सरकारी पक्षांच्या युक्तिवादानंतर बचाव पक्षाच्या युक्तिवादाला सुरुवात झाली. मंगळवारी (दि. ८) डॉ. हाळनोर यांचे वकील ॲड. ऋषिकेश गानू यांच्यासह आरोपी आदित्य सूदचे वकील ॲड. सुदीप पासबोला यांचा व्हिडीओकॉन्फरसिंगद्वारे, अश्पाक मकानदारचे वकील ॲड. राजेश काळे यांचा युक्तिवाद झाला. ॲड. गानू यांनी 'दस्तऐवज' व 'मूल्यवान रोखाचा 'दस्तऐवज' या दोन संकल्पनांमध्ये स्पष्ट फरक आहे असे सांगून दोन्ही संज्ञांची व्याख्या मांडली. कुठल्या कलमांतर्गत आरोप आहेत, त्याचा मसुदा दिला गेला; पण कलमे कशी लागू नाहीत त्याचा तपशिल मांडला.

मकानदारच्या वतीने ॲड. राजेश काळे यांनी युक्तिवाद केला की, भादंवितील कलम ३४ व १२० हे एकत्र लागू शकत नाहीत. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याचे कलम ७ व ७ अ हे लागू होत नाही. कारण आरोपपत्रात विशिष्ट मागणी दाखवलेली नाही, तसेच त्या कलमांचे आवश्यक घटक पूर्ण होत नाहीत. त्यामुळे मौल्यवान सुरक्षा व दस्तऐवज या मुद्यांवर मसुदा आरोप नव्याने विचारात घेण्याची गरज आहे.

आदित्य सूदचे वकील ॲड. सुदीप पासबोला यांनीही युक्तिवाद केला. भारतीय दंड विधान कलम १०९, तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील कलम ७ व ७ अ लागू होत नाहीत, तसेच बनावट दस्तऐवज तयार करण्यासंबंधीचे आरोप लागू होत नाहीत, असे नमूद केले. विशेष सरकारी वकील शिशिर हिरे यांनी या प्रकरणातील सीडीआर सादर केला. पुढील सुनावणी ११ जुलै रोजी होणार आहे.

### अगरवालचा जामिनासाठी अर्ज

मुलाच्या रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी कारागृहात असलेल्या विशाल अग्रवाल याने आई आजारी असल्याने न्यायालयात जामिनासाठी अर्ज केल्याची माहिती विशेष सरकारी वकील शिशिर हिरे यांनी दिली.

Pune Main
Page No. 8 Jul 09, 2025
Powered by: erelego.com

लोकमत

# हत्या केल्यामुळे गलगट बंधूंना जन्मठेपेची शिक्षा

## सत्र न्यायालय : २० हजार रुपये दंड ठोठावला

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** एका इसमाची हत्या केल्यामुळे नारी रोड येथील गलगट बंधूंना मंगळवारी जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली व प्रत्येकी दहा हजार रुपये दंड ठोठावण्यात आला, तसेच दंडाची रक्कम जमा न केल्यास दोघांनाही सहा महिन्यांचा अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असे निर्णयात स्पष्ट करण्यात आले. विशेष सत्र न्यायालयाचे न्यायाधीश जे. ए. शेख यांनी हा निर्णय दिला.

दीपक गलगट (२५) व उज्ज्वल गलगट (२३) अशी आरोपींची नावे आहेत. तिसरा आरोपी साहील अल्ताफ खान (२५) याला सबळ पुराव्यांअभावी निर्दोष सोडण्यात आले. मृताचे नाव कमलेश ऊर्फ गोलू बंडू सहारे (२६) होते. उज्ज्वलने सहारेला धारदार चाकूने भोसकले, तर दीपकने त्याच्या डोक्यावर बेसबॉलच्या बॅटने वार केले. त्यावेळी खानने सहारेला पकडून ठेवले होते. ही घटना १८ ऑगस्ट २०२१ रोजी सायंकाळी ७:३० च्या सुमारास घडली, असे सरकारचे म्हणणे होते. कपिलनगरचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अमोल देशमुख यांनी प्रकरणाचा तपास पूर्ण करून आरोपींविरुद्ध खटला दाखल केला होता. न्यायालयात सरकारच्या वतीने ॲड. प्रशांत साखरे यांनी कामकाज पाहिले. त्यांनी विविध ठोस पुराव्यांच्या आधारावर हत्येचा गुन्हा सिद्ध केला.



### आरोपींच्या बहिणीला छेडले

गड्डीगोदाम येथील रहिवासी असलेला सहारे त्याच्या बहिणीला भेटण्यासाठी नारी रोडवरील म्हाडा कॉलनी येथे गेला होता. दरम्यान, त्याने गलगट बंधूंच्या अल्पवयीन बहिणीची छेड काढली. त्यामुळे आरोपींनी त्याची हत्या केली, असा दावा सरकारने केला होता.

महाराष्ट्र टाइम्स

# रक्ताचे नमुने बदलण्याचा 'औंध'लाही प्रयत्न



धनमस्तीचे बळी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

कल्याणीनगर 'पोर्श' अपघातानंतर ससून रुग्णालयाप्रमाणेच औंध येथील जिल्हा रुग्णालयातही अल्पवयीन कारचालकासह मित्रांच्या रक्ताचे नमुने बदलण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा सरकार पक्षाने केला. या संदर्भात जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांसह वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे जबाब असलेली कागदपत्रे विशेष सरकारी वकील शिशिर हिरे यांनी मंगळवारी पुणे न्यायालयात सादर केली.

या प्रकरणातील सर्व आरोपींविरोधात बनावट दस्तावेज तयार करण्यासह भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील कलमे लागू होत नाहीत. त्यामुळे आरोप स्पष्ट होत नाहीत, असा युक्तिवाद बचाव आरोपींच्या वकिलांनी केला.

अपघाताच्या घटनेनंतर कारचालक मुलगा व त्याच्या मित्रांच्या रक्ताचे नमुने बदलण्यासाठी विशाल अगरवाल, शिवानी अगरवाल आणि अरुणकुमार सिंग यांनी अश्पाक मकानदार, अमर गायकवाड, आदित्य सूद, आशि, मित्तल यांच्याशी संगनमताने शिपाई अतुल घटकांबळेमार्फत 'ससून'च्या आपत्कालीन विभागाचा तत्कालीन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीहरी हाळनोर आणि न्यायवैद्यक विभागाचा तत्कालीन प्रमुख डॉ. अजय तावरे यांना लाच दिल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले. या १० आरोपींविरोधात आरोप निश्चितीची प्रक्रिया सुरू असून, त्यावर मंगळवारी बचाव पक्षातर्फे ॲड. सुदीप पासबोला, ॲड. हृषीकेश गानू आणि ॲड. राजेश काळे यांनी युक्तिवाद केला.

भारतीय दंड विधान कलम १०९; तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील कलम सात (सार्वजनिक सेवकाकडून लाच स्वीकारण्याचा किंवा देण्याचा प्रयत्न) आणि सात अ (सरकारी कर्मचाऱ्यांवर प्रभाव पाडण्यासाठी अनुचित फायदा घेणे) हे या प्रकरणाला लागू होत नाहीत. बनावट दस्तऐवज तयार करण्यासंबंधीचे आरोपही लागू होत नाहीत, असा युक्तिवाद ॲड. पासबोला यांनी केला. ॲड. गानू आणि ॲड. काळे यांनीही मुद्दे मांडले. पुढील सुनावणी ११ जुलैला होणार आहे.

> “ अपघातानंतर कारचालक मुलगा व त्याच्या दोन्ही मित्रांच्या रक्ताचे नमुने 'ससून'प्रमाणेच औंध जिल्हा रुग्णालयातही बदलण्याचा प्रयत्न झाला आहे. या संदर्भात जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांसह वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे जबाब असलेली कागदपत्रे न्यायालयात सादर केली आहेत.
>
> – ॲड. शिशिर हिरे, विशेष सरकारी वकील

### आई आजारी असल्याने जामिनाची मागणी

आई आजारी असल्याने जामीन देण्यात यावा, अशी मागणी करणारा अर्ज आरोपी विशाल अगरवाल याने केला आहे.